ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांसाठी गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समित्यांमध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचा उपाध्यक्ष म्हणून समावेश करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००५/प्र.क्र.६२/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ३१ मार्च, २००५**

**वाचा**:-(१) शा.नि.क्र.पा.पु.व स्व.वि. क्र.ग्रापापु-१००१/प्र.क्र.३३०/पापु-०७, दिनांक १४.२.२००२
(२) शा.नि.क्र.पा.पु.व स्व.वि. क्र.ग्रापापु-१००३/प्र.क्र.२१०/पापु-०७, दिनांक १४.१०.२००३
(३) शा.नि.क्र.पा.पु.व स्व.वि. क्र.ग्रापापु-१००४/प्र.क्र.४७/पापु-०७, दिनांक २.४.२००४
(४) शा.नि.क्र.पा.पु.व स्व.वि. क्र.संस्वअ-१००२/प्र.क्र.१२७/पापु-१६, दिनांक ६.१२.२००२

प्रस्तावना:-

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करुन (सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३) कलम ७९क नुसार जिल्हा परिषदे अंतर्गत **जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती** गठीत करण्याची सुधारित तरतूद अंतर्भूत करण्यात आली आहे. त्यानुसार **जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीचे** सदस्य-सचिव जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना करण्यात आले आहे. जिल्हा परिषद स्तरावरील पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक योजनांच्या धोरणात्मक बाबी ही समिती हाताळत आहे.

२. पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी संदर्भीय शासन निर्णयांन्वये जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यकारी समित्या गठीत केल्या आहेत. या जिल्हास्तरीय समित्यांमध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना अंतर्भूत करण्यात आलेले नाही, त्यामुळे संदर्भिय शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समित्यांमध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन संदर्भीय शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील सर्व जिल्हास्तरीय समित्यांमध्ये **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद** यांचा **"उपाध्यक्ष"** म्हणून समावेश करण्यात येत आहे.

२. तसेच संदर्भिय क्र.४ येथील दिनांक ६.१२.२००२ च्या शासन निर्णयान्वये संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या अंमलबजावणीसाठी विविध स्तरावर गठीत करण्यात आलेल्या सर्व समित्या रद्द करण्यात येत असून संपूर्ण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणीसाठी आता संदर्भिय क्र.३ येथील दिनांक २.४.२००४ च्या शासन निर्णयात नमूद विविध स्तरावरील समित्या कार्यरत राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(सुधीर ठाकरे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,
१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
४. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
५. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
६. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,(सर्व).
७. प्रादेशिक उप सचंलाक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
८. सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी.
९. सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
१०. गट प्रमुख, जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद (सर्व)
११. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद, (सर्व)
१२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
१४. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, (सर्व)
१५. उप अभियंता, यांत्रिकी उप विभाग, जिल्हा परिषद, (सर्व)
१६. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व सर्व कार्यासन अधिकारी.
१७. निवड नस्ती (पापु-०७)

D:\BACKUP WS07\year 2005\CR 62 Add.CEO 30.3.05.doc